# धावत्या जगातले दु:ख दाखविणारे नाटक : कधी ऐकशील कां रे ?

**प्रा. गणेश सांगोळकर**
*मराठी विभागप्रमुख*
*सहादेवराव भुते कला महाविद्यालय*
*साळवा ता. कुही, जि. नागूपर*

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कविता प्रमाणेच नाटक हा वाङ्मय प्रकार महत्वाचा आहे. आज साहित्यामध्ये शिखराची उंची नाटक या वाङ्मयाने घेतली आहे. नाटक हे वाचक वाचण्याच्या रूपाने सुध्दा कलाकृतीचा आस्वाद घेऊ शकतात परंतू रंगभूमी अशी ही देण नाटकाला लाभली आहे की, नाटक हे आज घरा घरात पोहचले आहे. नाटक एक कलाकृती असली तरी तिचा वारसा हा प्रबोधनाचा आहे. आज समाज वास्तव स्पष्ट करण्यात नाटक हे सिद्ध रूपाने उभे आहे.

नाटक हा एक दृकश्राव्य कला प्रकार आहे. या संज्ञेचा मुळ अर्थ अभिनय करणे असा आहे. 'नट' हा संस्कृत शब्द मुळात प्राकृतातील असून तो 'नर्त' म्हणजे नाचनारा या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन प्राकृतात आला नट म्हणजे अभिनय करणारा, सोंग करणारा व नाटक म्हणजे नाट्य रूपाने सोंगाच्या रूपाने दाखविणे असा अर्थ रूढ झाला. इंग्रजीतील 'ड्रामा' हा शब्द मुळ ग्रीस 'ड्रेन' या शब्दावरून आलेला असून त्याचा अर्थ कृती करणे (to do) असा आहे. 'ड्रामा नान' (Dramonon) म्हणजे केलेली कृती व 'माय थॉस' (Mythos) म्हणजे सांगितलेली कृती असा फरक प्राचीन ग्रीस मध्ये केला जाई. नाटक म्हणजे प्रसंगी आणि संवाद यांच्या द्वारा व्यक्त होणारा संघर्षमय कथात्मक अनुभव असे म्हणता येईल. किंवा नाटक म्हणजे मानसाच्या अंतर्बाह्य क्रिया प्रतिक्रियांचे दर्शन घडविणारा आकृतीबंध होय."[1]

नाटकाचे प्रामुख्याने दोन प्रकार दिसतात ज्यामध्ये पहिले आनंद प्रधान नाटक ज्या पासुन आपण सुखाचा आनंद अनुभवू शकतो ज्याला सुखात्मिका म्हणता येईल. जिथे विनोद सुध्दा निखळपणे नांदत असतो उदा. पु. ल. देशपांडे यांचे 'तुज आहे तुजपाशी', प्र. के. अत्रे चं 'मोरूची मावशी' इत्यादी. आणि दुसरा प्रकार म्हणता येईल शोक नाट्य म्हणजे दु:ख प्रधान ज्याचे उदाहरण म्हणजे वि.वा.शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' नाटक. पुढे अनेक उपप्रकार दिसून आलेत आज हल्ली नाटकाचा जो कल आहे ज्याला आधुनिक ठेवा लाभलेला आहे तो म्हणजे समस्याप्रधान नाटक होय. माणसाला अनेक प्रसंगांना समोर जावे लागते. सुख द:खाचा सतत परिणाम त्यांच्यावर होत असतो. शोक, व्यथा, वेदना, यातना, आपत्ती, हाल यांच्याशी शोक नाट्याचा संबंध आहे. शोकात्मक, शोकजनक, शोककारक, शोकांत हे विशेषण वाचक शब्दाचे पर्यायी शब्द दिसतात. आत्यांतिक दु:ख, नैराश्य, दारिद्रय, अपेक्षाभंग, असाध्य, मृत्यू, आपत्ती अशा अनेक संदर्भांनी समाज जीवनात 'ट्रॅजिक' व 'ट्रॅजिडी' हे शब्द वापरल्याचे दिसून येते. वृध्द अप्पासाहेब बेलवलकर अशा शब्दांना बळी पडल्याचे नटसम्राट मधून जाणवतात. म्हणूनच या नाटकाला शोकांतीकेच्या मुळाशी बांधले गेले. ॲरिस्टॉटल ने अचूक सिध्दांत मांडला आणि शोक नाट्याची संकल्पना त्याच आधारे मांडतांना म्हटले की, शोक नाट्यात एखाद्या कृतीचे दर्शन घडविले असते ती कृती गंभीर स्वरूपाची असते. त्यातून रचनाबंध व बाह्यस्वरूप ध्वनित होते आणि म्हणूनच शोकनाट्यात संवाद व भाषेला महत्व असते. कारण त्यातूनच प्रेक्षकांच्या मनात करूना, भिती यांचा क्षोभ होऊन भावनाए विचारांचे विवेचन होते. शोक नाट्य हे गंभीर स्वरूपाचे एक समस्याप्रधान नाटक असते."[2]

नाटक कलाकृतीचे यश खऱ्या अर्थाने हे मानसाच्या मनावर होणारा परिणाम, समाजाला ही कलाकृती कोणती बांधीलकी देत आहे यातून प्रकट होते. नाटकातून होणारी सुख दु:खाची मांडणी कितपत प्रभावी आहे याचे भानच कलाकृती साकारत असते. तंजावरी नाटके ते विष्णूदास भावे यांच्या नाटकातील समाजवास्तव, त्यानंतर आलेली नाटके अण्णासाहेब किर्लोस्कर, गडकरी अशी नावे पुढे गाजलीत. शोकनाट्याचा प्रभाव ही पुढे दिसुन आला. बदलत्या परिस्थितीनुसार मराठी नाटकावर पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव सुध्दा प्रेरीत झाला. मराठी नाटकात आधुनिकता पेरली गेली. जरठ कुमारी विवाहए जाती भेदए स्त्री-पुरूष संबंध, हुंडा विरोधी असे विषय नाटकातून हाताळले गेले. स्वातंत्र्य पूर्वीची नाटके आणि त्यानंतर आलेली नाटके यामध्ये बराच बदल घडून आला. नव्या

दमाचे लेखक समाजात उभे झाले. विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर यांच्या नाटकांनी इतिहासच घडविला. 'घाशीराम कोतवाल' तेंडुलकांरोचे हे क्रांतीकारी नाटक उदयास आले. वास्तववादी लेखनाची दिशा नाटकाला प्राप्त झाली. खालच्या उपेक्षित समाजाचे प्रश्न नाटकातून साकार करण्याला यश आले. प्रेमानंद गज्वी यांचं 'किरवंत' हे नाटक आलं. किरवंत मधून मांडलेली गज्वी ची भूमिका एक लक्षणिय विशेष ठरली. दत्ता भगत यांचे 'वाटा पळवाटा' आले. असे अनेक नवे नवे नाटककार उदयास आले. समाजातील चिंतणशील विषय घेऊन महेश येलकुंचवार यांचे नाटक रंगभूमीवर उभे झाले. 'आई रिटायर होतेय' सारखं स्त्री प्रश्नांचं बुरूज घेऊन नाटक रंगभूमिवर उभं झालं. 'सावल्या', लग्न', चारचौघी' यासारख्या नाटकामधुन स्त्री चे जीवन त्याचा संघर्ष प्रकटल्या गेला. प्राचीन काळातील स्त्री आणि झपाटलेल्या काळातील स्त्री तीचा नवा विचार नवा कोंडमाराच प्रस्तापित नाटककारांना उभा केला.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या काळातील एक महत्वाचे नाटककार पुढे दिसतात. ते म्हणजे जयवंत दळवी. 'बॅरिस्टर', सुर्यास्त', महासागर', सावित्रि' त्यांच्या नाटकामधून राजकीयए सामाजिक तर कौंटूबिक संघर्ष पहावयास मिळतो. आपल्या समाजवास्तवाचे देखते चित्रण दळवी यांच्या नाटकांनी उभे केलेले दिसते. वाढत्या चित्रपट सृष्टीचा प्रभाव झुगारून नाटकांनी आपली सिध्दता साकारली असल्याचे म्हणावे लागते. नाटकाची प्रगल्भता पुढे कमी न होता एक प्रभावी दर्शन नाटकातून घडतांना दिसते.

आज पर्यंतच्या नाट्यसृष्टीचे टप्पे पाहता अनेक अनुभवातून नाटकांचा प्रवास उभा होतो. एकविसाव्या शतकात अनेक प्रश्न उभे झालेले आहेत. उदा. कुटुंब, समाज, राजकारण, स्त्री-पुरूष संबंध, तरूणाई, बालसमस्या इत्यादी. या प्रश्नांची उकल करण्याकरीता अनेक नाटककार समोर आलेले दिसतात. त्यात एक नाव म्हणजे नाटककार पराग घोंगे. आज नवीन पिढीच्या नाटककारामध्ये पराग घोंगे यांचे नाव आवर्जुन घ्यावे लागते. त्यांनी आपल्या नाटकामधून माणसांच्या बारीक सारीक प्रश्नांची उकल केलेली आहे. प्रेमए प्रेमातील विद्रोह, शहरी जीवनातील गुंतागुंतए गर्दीमधील भयग्रस्तताए वाढत्या वयमानात आयुष्यातील बिकट अनुभव, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांमधील विचार जाणीवा, प्रामुख्याने त्यांच्या नाटकामधून स्पष्ट झाले आहे. चक्रव्युह, प्रतिध्वनी, वाळूचं घर, पहाट पक्षी, पहिलं तीर, ऋतू आठवणींचे, परिक्रमा, आधार कसा शोधावा, कधी ऐकशील का रे, इत्यादी नाटके तर क्षितीजाच्या पलिकडे, दहशतए मंथनए अस्थेटिका, ऋणानुबंध, जखम, अंधार कैद, फुलवाए दिवे जरास मंदच असू दे, ऋतुचक्र, मृगजळ, कोष, सखी गं सखी इत्यादी एकांकिका त्यांनी लिहिल्या आहेत.

कधी ऐकशील का रे ? हे पराग घोंगे यांचे 2009 साली प्रसिध्द झालेले नाटक. सुशिक्षित कुटूंबातील व्यथा दोन अंकाच्या माध्यमातून लेखकानी रेखाटली आहे. शहरातील धावपळए आईच्या प्रेमाणे लाडावलेले मुल कसं आयुष्यातून निघून जातं याचं नेमकं दर्शनच नाटकातून झालेलं आहे. मुलाला वडिलांचा थोडाफार धाक असावा लागतो तो धाकच नाटकात उरलेला नाही. कुटुंबात पती पत्नीच्या वरपांगी जीवनाचं दर्शन दाखवतात. दोघेही चांगले कमावते असून एकत्र राहू शकत नाही ही या नाटकाची खरी शोकांतिका आहे. वडिल दूर राहतात, आई जवळ मुल मोठं होतं, मुलाचं हट्टं पुरविण्यासाठी आई त्याला मोटर साईकल घेऊन देते, मोटार साईकीलचा अपघात होतो, त्यामध्ये एकुलत्या एक मुलाचं अपघात होऊन् जीव जातो. हे समाज वास्तव नाटककार कधी ऐकशील का रे? नाटकाद्वारे दाखविण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

भारतीय समाज देव, अंधश्रध्दा, भ्रामक कल्पना यावर विश्वास ठेवणारं आहे. माणसाचा मृत्यू झाल्यावर त्याचा आत्मा कुठेतरी भटकत असतो. मग एखादी तरूण व्यक्ती मरण पावली तर त्याची भिती माणसाच्या अंतरंगात चांगलीच दहशत घालते. अशा अंधश्रध्दाळू समाजाला अवयव दानाची कल्पना नाटकातून देऊन एक आदर्श विचार नाटककार पराग घोंगे यांनी कधी ऐकशील का रे? मधून प्रकट केला आहे.

सुरूवातीलाच नाटकामध्ये साधना या पत्रकार महिलेचा उल्लेख आला आहे. नवऱ्यापासून दूर राहून एकटे जीवन ती काढत आहे. रितसर त्यांचा घटस्फोट झाला नसला तरी समजूतपणा घेऊन दूर राहण्याचा निर्णय दोघांचा आहे. वैभव एकुलता एक मुलगा साधना जवळ असतो. आईच्या प्रेमात गुंतलेला 'मम्माज बॉय' अशी त्याची कल्पना आहे. आईच्या आणि त्याच्या संवादामधून आधुनिक विचाराचा गंध नाटकातून जाणवतो. वैभवला भेटायला येणारी त्याची मैत्रीण पुनम यावरून नवीन पिढीचा देखावा लेखकांनी पुढे केला आहे. साधना समोर पुनमच्या संबंधाबद्दल बोलतांना वैभव म्हणतो, आम्ही फक्त मित्र आहोत' हे वाक्य त्याच्या मनातील गुढ स्पष्ट करतांना दिसते. वैभवचे वडील पोलिस विभागात आणि त्याची आई पत्रकार असूनही वैभव

वडिलांच्या प्रेमापासून, धाकापासून मुकावे लागते. पुनम साधनाला आवडते, वैभव साठी त्याची जीवनसाथी म्हणून सुध्दा तीचा होकार स्पष्ट दिसतो. 'मी पत्रकार आहे, सार्वजनिक जीवनात मी जात धर्म मानत नाही.' अशा वाक्यातून साधनाच्या विचारांची ऊंची कळते.

साधना पत्रकाराच्या रूपाने नाटकामधून दैनिक लेखनाचा आढावा ही स्पष्ट करते. पत्रकारांना भान ठेवूनच लेखन करावे लागते. समाजकारण, राजकारण जपतांना पेपरच्या मालकाचा दबाव पण सहन करावा लागतो. 'आमच्या सारखी मधली माणसं खरं तर या दोन बिंदूमधला दुवा असतो.' हे वाक्य वास्तव सांगतांना दिसते. नाटक जसे जसे पुढे सरकतांना जाणवते त्यामूधन हलकासा विनोद पण उतरतांना दिसतो. ' अगदी बहिन भाऊ शोभता.... मग यंदा हिच्या हाताने राखी बांधु का ?' अशी अलगद वाक्य ओठावर हसू आणतात. पुनम आणि वैभव यांचे मैत्रिपूर्ण संबंध तग धरतांना जाणवतात. 'ऑन्टी, आमचं काही अफेअर वगैरे नाही' हे पुनमचं वाक्य, यावरून आजची पिढी किती समोर गेली आहे हे दाखवायचं आहे.

सुरूवातीलाच नाटकामधून वैभव, साधना, पुनम यांचा निखळ संवाद पहावयास मिळतो. वैभव चा थोडा अल्लडपणाए अनुभवातून जगलेली साधना पुनम आणि वैभवच्या प्रेमात रमतांना दिसते. परंतू तिचा हा प्रेमाचा उल्हास हा क्षणिकच ठरतो. 'जोराने बाईक चालवू नको' ही आईची धाकाची पर्वनी मात्र वैभव साठी फोल ठरते. त्याचा अपघात होतो, त्याच्या मेंदूला मार लागतो, त्याचा जीव जातो अशात साधनाला आधार मिळतो तो पुनमचा. वैभव चे वडिल बंगलोर ला असतात. लहानपनीच विभक्त झालेले त्याचे वडिल मोनीमॉय अपघाताने पुन्हा जवळ येतात. साधनाच्या डोळयासमोर वैभव जातांना दिसतो. अशातच तिच्यासमोर डॉ. अवयव दानाची कल्पना डॉक्टर मांडतात. हृदयावर एवढा मोठा आघात बसूनही साधना अवयव दानाच्या कल्पनेत समरस होते.

दूर राहिलेले वैभवचे वडिल मोनिमॉय यांनी किती मोठी चुक जीवनात केली अशी पश्चातापाची वाणी समोर प्रकटते. 'कदाचीत आपल्या पापाची शिक्षा देवाने त्याला दिली आहे.' 'अहंकाराची शुद्र लढाई आपण लढलो? वैभवला आईची माया मिळाली पण बापाचा धाकही हवा होता.' अशा वाक्यातून आई वडिलांच्या कर्तव्याची हिन दक्षता पहावयास मिळते. एकुलता एक मुलगा गेल्याने आईचा विलाप नाटकातून जाणवतो. "मला माझ्या वैभवला भेटायचं आहे, तो आता मला कधीच दिसणार नाही, त्याच्या शिवाय मी अपुर्ण आहे मोनीमॉय, तो माझा सर्वस्व होता, तो एकटा गेला नाही मोनीमॉय, माझ्यातली आई सोबत घेऊन गेला आहे.... आता मी कुणासाठी जगू? डॉक्टर मला मरायचं आहे... आय डोन्ट वान्ट टू लिव्ह... आय वान्ट टू डॉय..."[3]

मुलगा गेल्याने पोलिस असलेल्या मोनीमॉय मध्ये फरक पडतो. त्याचा चिडखोर स्वभाव शांत होतो. परंतू साधनाला समाधान वाटत नाही. कायदेशी डॉयव्होर्स ती मोनीमॉय ला मागते. 'आपल्यातलं नातं कधीच मेलेलं आहे' हे तीचं बोलणं तिच्या नकारार्थी मनाची रेखा समोर करते. बंगलोर वरून नौकरी सोडली, आता तुला जपाया इथेच राहणारए मोनिमॉय साधनाला जरी सांगत दिसतो तरी साधनाला त्याचा आधार नकोसाचा वाटतो. झोपेत साधना वैभव सोबत बोलते, असा आईचा वेडेपणा मुलाविषयी नाटकात दिसतो. मोनिमॉय तीला एखाद्या सायकीअॅट्रीस्ट कडे नेण्याचा सल्ला देतो, साधना पागल झाली का? असा सवालही मोनिमॉय समोर साधना फेकते. यावरून मुलासाठी आईची झालेली मनोवस्था नाटकात वारंवार जाणवते.

लेखकांनी वैभवच्या दुःखामधून बुध्दाची जाणीव समोर करून दिली आहे. "खरं आपलं दुःख ही असतंच भगवान बुध्द म्हणतात की, सर्वत्र दुःख आहेच, प्रत्येक दुःखामागे एक कारण आहे. ते कारण नाहीसं केलं जावू शकतं."[4]

मुलाचं दुःख सावरण्यासाठी पुनम ही मोनिमॉय आणि साधना यांना आई वडिलां समानच मानते. दोघांच्या मनांचे सांत्वन मनोमनी करतांना दिसते. साधना सावरायला लागते तीला असीम मुखर्जी या सायकीअॅट्रीस्ट कडे मोनिमॉयने घेवून गेल्याने विलक्षण प्रभाव तिच्या मनोवृत्तीवर दिसू लागतो. आपल्या कामाकडे ती लक्ष पुरवाया लागते. बंगलोरच्या आठवणीत मोनिमॉय साधनाला घेऊन जातो. तिथल्या सायली या मुलीला आपली मुलगी मानले असेही सांगतो. स्वतःच्या परिवारापासून दूर राहून दुसऱ्याच्या मुलांना आपलं करण्याची वृत्ती हा माणसाचा स्वभाव नाटकातून लेखक दाखवतात.

वैभवला जावून एक वर्ष होतो परंतू साधना वैभवच्या दुःखातून पुरेपुर मुक्त होतांना दिसत नाही. "एकदा एका मानसाने एका झाडाला घट्ट धरून ठेवलं आणि ओरडायला लागला, मला या झाडानं धरलं आहे..... या झाडानं धरलं आहे.... एका संतान येऊन अलगद त्याचे हात सोडवले आणि तो त्या मानसाला म्हणाला, बघ झाडानं तुला धरलं